REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 10 | JULY - 2020

# आडदशावतार - 'संकासूर आख्यान' संहिता संपादन

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

## प्रस्तावना

(मालवणी मुलुखात या पुर्वरंगाला काही ठिकाणी 'संकासूर आख्यान' असेही म्हणतात. हे आख्यान सर्वच दशावतार नाटकात जवळजवळ सारखेच असते.) दशावताराची सुरुवात गणपतीच्या नमनाने होते. गजाननाच्या प्रवेशानंतर भटजीचे आगमन होते. पूजा करताना त्याचे बोलणे स्थानिक भाषेतील विनोदी ढंगाचे असते. रंगमंचावर गणपतीच्या प्रवेशापूर्वी पडदा (चादर) धरला जातो यावेळी भटजीचा प्रवेश होतो. डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, 'लोककलेची प्रमाणनिश्चित संहिता नसली तरी जो प्रयोग होत असतो, ती त्या प्रयोगाची संहिता ठरत असते. काही मर्यादेपर्यंत हि संहिता सतत बदलनारी असू शकते.'[१] थोडक्यात प्रयोगरुप लोककलेची संहिता हि परिवर्तनशील असते. आडदशावतारातील संकासुर आख्यान याला अपवाद नाही.

## वेशभूषा

गजानन : चर्तुभूज बाजूला ऋध्दिसिध्दि (गजाननाच्या अंगावर लाल पितांवर शेला ऋद्धिसिद्धि आगमन नऊवारी साड्या)
सरस्वती : मोरावर आरूढ झालेली.
भटजी : उजव्या हातात तांब्या, डाव्या हातामध्ये काठी, खांद्यावर उपरणे, तोंड तांबड्या रंगाचे व गळ्यात जानवे.
ब्रह्मदेव : पिवळा पितांबर हातात काठी, डोकीला पांढ-या केसाचा टोप, भरगच्च पांढरी शुभ्र दाढी व अंगरखा
संकासूर : संपूर्ण शरिरावर काळे वस्त्र, डोळे नाक तोंड याठिकाणी बुरख्याला छिद्रे असतात व लाल रंगाचा कापडी तुकडा लावून लोंबणारी जीभ केलेली असते.
भटजी : मोरया मोरया वर या वर या असे म्हणत येतो.
नाईक : अहो भटजी महाराज, मोरया मोरया हे नामस्मरण झाल, तर वर या वर या चा भावार्थ काय ?
भटजी : आयकलांत नायकानु, या संसारात तरुन जाण्यासाठी ओर या ओर या असां म्हणतय. हॅ गणपती पूजन असा नां ता करुक ईलय.
नाईक : मग वाट कसली पाहतां, पूजेला सुरवात करा. अहो..अहो भटजी हे काय करताय?
भटजी : तळी बघतय तळी.
नाईक : अहो या ठिकाणी देवाची तळी नजीक आहे.
भटजी : नायकांनु, हयसर मोठी यात्रा भरलीसां. कोनी हातपाय घुल्ले आस्तले. कोन्नी तॉंड धुल्ला आस्तला. आता मिया धुतय.
नाईक : पण हे काय धुताय.
भटजी : सोवळा धुतय.
नाईक : पण ते परीटाच्या घरी का पाठवले नाही?

भटजी : परटाकडे दिल्लय, पन तेनी बरां धुवक नाय म्हणान मिया परत धुतय. नायकानु.. आज लय उकाडतां म्हनान हॅं बेगीन वाळान यिला.

नाईक : अहो भटजी महाराज पूजेला सुरवात करा, ढुंगण का हलवित आहात?

भटजी : गांध उजाळतय.

नाईक : अहो गंध असे म्हणा.

भटजी : आता गंध आसां तूच म्हण (आचमन करतो) महागणपती नमः चंदनम समर्पयामी, महागणपती नमःपुष्पं समर्पयामी, महागणपती नमः अक्षतां समर्पयामी, महागणपती नमः महानेवेद्यं समर्पयामी.

नाईक : अहो भटजी महाराज ही मध्यरात्रीची वेळ आहे. तुम्हाला महानेवेद्य कुठुन मिळणार?

भटजी : त्याच्यासाठी बाजाराक पाणी सोडलय.

नाईक : अहो बाजार वाहून जाईल.

भटजी : नायकानु, बाजाराक ईतक्या पानी सोडूचय नाय, परतेक वस्तूच्या नावान पाणी सोडतय, लाडवान समर्पयामी. भज्यान समर्पयामी, खाज्यान समर्पयामी, वडापावान समर्पयामी. येजान, समर्पयामी.

नाईक : अहो भटजी महाराज येज म्हणजे काय?

भटजी : अरे खाजा सोपल्यांर गूळ शिल्लक अस्ताना तेचे पैसे येजाने (व्याजाने) वसूल करतात ना त्याका येज म्हणततं. देवळान समर्पयामी..

नाईक : अहो भटजी महाराज, देवाने देऊळ खाल्ले तर देव कुठे राहणार?

भटजी : नायकानुं.. देव रवतां ता देऊळ न्हाय. मेवा मिठायाच्या दुकानात देवळाच्या आकाराचे साखरेचो पदार्थ तयार केल्लो आस्ता नां तेका देउळ हुनतत. गाठल्यान समर्पयामी.

नाईक : अहो भटजी महाराज गाठल म्हणजे काय हो? कुणी कुणाला गाठलं?

भटजी : तसा कोणी कोणाक गाठल्यान नाय. पन मेवामिठायच्या दुकानात साखरेची जी गाठली आस्तत ना तका गाठली म्हणतत.

(यासारखी चेष्टामस्करी करुन गणपतीची आरती म्हटली जाते. गणपतीचे वाहन जो उंदीर त्याला 'वायट तुज्या खायलो' असे म्हटले जाते.)

नाईक : पूजा झाली, नेवैद्य झाला, आरती राहिली?

भटजी : आता आरती हुनतय --

'बटबट्या डोळयांचो, फटफट्या कानांचो
ह्यो बघ सोनयाळयो
झील जालो तो बघ ह्यो बघ खडयाळ्यो
झील जालो तोरो बा ह्यो बघ सोडयाळ्यो
वरसून दिस्ता बरो वायट तुज्या खायलो.'

नाईक : भटजी महाराज 'वायट तुजो खायलो' म्हणजे काय?

भटजी : नायकानू, 'वायट तुजो खायलो' याचा भावार्थ असा की गणपतीचा वाहन उंदीर त्याका वाईट म्हटला जाता. कारण काय तर तो वाळत घातलेले कपडे खाता.

नाईक : अहो म्हटजी महाराज आता उंदीर रागावला, त्याचे सात्वंन करा.

भटजी : आता एक आरती म्हणतय.---

जयदेव जयदेव जय उंदीर मामा
गाडक्या मडक्यावरती काय तुजी मजा
मध्यानराती पडली बोक्याची गाठ
संकट निवारी गजानन मोरया

भटजी : आता माझी पूजा झाली नेवेद्य जालो, आरती आटापली. आता एक बरी आटवन ईली. आवशीबापाशीन नवास केल्ल्यान माका झील जालो तर फुगडी घालीन म्हणान. आता तो नवस तेतुरल्या तेतुर फेडून घेतय. (भटजी फुगडी घालतो) पाटल्या दाराचे फुडल्याक नळे मड्याक गाव काडता गळे

नाईक : अहो भटजी, ही बायकांच्या फुगडीसारखी लाजत मुरडत ठुमकत घातलेली फुगडी चालत नाही. जरा देवाची फुगडी घाला.

भटजी : मिया आता भुतूर देवाच्या समोर एका पायावरची तांब्यावरची फुगडी घालतय आनि नवास फेडून येतय.

नाईक : पद म्हणतो-(गणपती नाचतो)
पद-केली गजवदनाची भक्ती साची रामदास लागे तुझे स्मरण हो गणपती या! (वाद्य व संगीत यासहित पद-तरी नां तां तरी नां तां! धरीत धिना तां थय्य थां! द्रौपदीचे वस्त्रहरण! फेडीता झाला दुःशासना! ऐकुनीया तिचे वचन, धावला श्रीहरी! (हेंचिंता तां थय्य थां! ताक धिन थां थय्य थां.) (पद नाच झाल्यावर गणपती व रिध्दिसिध्दि जाते.

नाईक : पद म्हणतो व मोरावर आरुढ झालेली सरस्वती नाचते.
अंबे त्रिपुर भैरवी आदी माये sss घाव जगदंबीके, पाव वेगे त्वरे...
धाव जगदंबीके पाव वेगे त्वरे.... लागला घोर संसार मागे त्वरे....
धाव जगदंबीके पाव वेगे त्वरे.... (शारदा येते)
आली ब्राम्हणाची कुमारी आरुढ होऊनी हंसावरी वीणा, पुस्तक घेऊनी करी, नाचे रंगणी हो, गणपतीया, तुझे नाम, (वादन - तदीना तिकदिना, तदिना, तादिना, तिकदिना (ताथय्य था) ब्रम्हकुमारी पाव मला... हे सरस्वती, (वादन - तिकतदीना, तिकदिना ताथाय्य था) द्रौपदीचे वस्त्रहरण करिता झाला दुःशासन ऐकुनी तव नामस्मरण घाव घे श्री हरी. (वादन-तिकतदीना ताथय्य थां तदीना तिक तादिना ता दीना तिकतदिना ताथय्य थां. शारदास्तवन संपते आणि मोर घेऊन आलेल्या कलावंताचा नाच सुरु होतो. हाच नाच संपल्यानंतर ब्रह्मदेवाचा प्रयोग सुरु होतो. पाठोपाठ शंखासुर येतो आणि गप्पाष्टकांना रंग भरतो.)

.नाईक : नारायण हे नमो नमो बतावणी सुरु होते. ब्रम्हदेव महामुनी या गंगतिरावर येउनी धानस्थ बसले आहेत. तेव्हा कश्यप पुत्र शंखासुर याचा धावा करुया. (सुत्रधाराचा धावा-शंखासुरा SSSS महावीराSSS शंखासुरा .... शंकासुर नाचत येतो.)

शंकासुर : मोठ्याने ओरडुन ए SSS इकडे कोण साट करीत, सूट करीत, गजाली करीत, त्येका बतीयेची शप्पथ ... हो बती जाऊन मारल्याशिवाय रवाची नाय, नाईक हयसर येऊन तुमी काय केलास?

नाईक : टाळमृदुंगाचा केला गजर, हरिनामाचा केला घोष.

संकासूर : आता सगळ्यांचो पाडुन टाकलयं दोष. नाईकजी तुम्ही इलात तेव्हा सभा कशी होती?

नाईक : फार गडबड चालु होती.

संकासूर : आता बघा पाण्यासारखी शांत करुन टाकलयं. असो माझो भय असा. असे भयामध्ये भय पाच आसत.

नाईक : असे कोणते?

संकासूर : घरात भय घरकारणीचो.

नाईक : घरापुरता.

संकासूर : गाव गावक-यांचो.

नाईक : गावापुरता.

संकासूर : देवळात भय देवाचो

नाईक : देवालयापुरतो
संकासूर : अरण्यात भय वाघाचो
नाईक : अरण्यापुरता
संकासूर : आणि या सभेत, संकासुराचो... नाईक आब्यावर जांबो, कोंबडीवर धोंडो आणि माडावर गाय...
नाईक : दैत्यनाथा या दोन तीन गोष्टी एकदम सांगितलात, पण एकाचाही अर्थ कळलेला नाही.
संकासूर : नाईक कटफु कटफु.
नाईक : म्हणजे काय?
संकासूर : नाईक फुकट गेलास.
नाईक : संखासुरा, आंब्यावर जांबा म्हणजे काय?
संकासूर : नाईक एक सावकाराचो पोरगो, गरिबा घरी कामाक होतो.
नाईक : दैत्यनाथा सावकाराचो की गरिबाचो?
संकासूर : गरिबाचो, त्याचा नाव टेंब्या, सकाळीच उठलो, तोंडावर शिरा मारल्यान तर मारल्यान...
नाईक : तुझ्या की काय?
संकासूर : माझ्या नाय आपल्या, गेलो तो सरळ, आड्यात रिघलो.
नाईक : आड्यात न्हय वाड्यात.
संकासूर : ताच तां. सगळी गोरवा सोड्ल्यान आणि माळावर न्हेवन पगळल्यान.
नाईक : वाळत टाकल्यान
संकासूर : वोऽ ऽ ऽ चराक सोड्ल्यान. नक्षीतार वरती इला.
नाईक : दिवसा नक्षत्रे उगवतात?
संकासूर : सुर्य माध्यानी इलो, पोरांच्या पोटात कावळे आरडाक लागले.
नाईक : झाडावर फिरतात ते?
संकासूर : वोSSS भूक लागली. भुकेने कावकुव होवक लागला. आरते परते बघल्यान. एक सरकारी आमराय होती. जवळ जावान बघता तर अशी रटुंळाच्या कंटुळा होती.
नाईक : कोणत्या जातीची?
संकासूर : हापूस म्हणा नुको, बापुस म्हणा नुको
नाईक : बापुस तुझो
संकासूर : माझो न्हय, गारपाची नवीन जात. करेल म्हणा नुको, परेल म्हणा नुको फर्नांडीस म्हणा नुको.
नाईक : त्या नावांचे कोण असतील, तर तुझो पेट काढतील.
संकासूर : काय म्हणतात त्येका
नाईक : फर्नाल म्हण.
संकासूर : हा S S ताच ता, जशी गारपा तशी फळा. पोरांच्या तोंडाक पाणी सुटला. सबंध माळभर फिरलो. धा बारा गुंडे जमा केल्यान आणि एक एक सोडुन दिल्यान.
नाईक : तुझ्या डोक्यावर?
संकासूर : माझ्या डोक्यावर न्हंय. गारपावर. धोंडो काय वर जायना, आंबो काय खाली येयना. पोराची झाली निराशा. आरते परते बघल्यान आणि सरळ कासेटाक हात घातल्यान.
नाईक : तुझ्या?
संकासूर : माझ्या न्हय. आप्ल्या कासटेचा केल्यान खाडु. रपारप चढलो आणि पाच पन्नास ढकलून दिल्यान.
नाईक : खाली जमिनीवर?

संकासूर : (वेडावून) खाली जमिनीवर तुमच्या घरकरणीन तुमका जेवक वाड्ल्यांन, तर ता पाटाखाली घातलास?
नाईक : खाऊन घेतो.
संकासूर : तशे त्यांना खावान घेतल्यान. खां खां खाल्ल्यान. तेवा पोराच्या पोटात उठले सुळांडे. त्याका हालाक गावाना. डुलाक गावाना. एक आड्वो डेळो होतो. त्याका लावल्यान पॉट आणि जोरात जांब दिल्यान. ह्याका म्हणतात आंब्यावर जांब...
नाईक मी शिवाचो शिवभक्त आसय. तेवा शिवा शिवा माधवा म्हणा.
(शिवा शिवा माधवा म्हणतो तोपर्यत संकासुर आंघोळ करुन येतो.) नंतर,
नाईकजी शिवभक्त झालो. पण हयसर घाण कसली येता?
नाईक : ब्रह्मदेव महामुनी या गंगातीरावर तप करण्यासाठी बसले आसत.
संकासूर : थंडी कुडकुड्याचो ह्यो हयसर मराक इलो हां? आणि ता भांड्वाल कसला?
नाईक : त्यांच्याजवळ चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे, चौदा विद्या, चौसष्ट कला साधने आहेत.
संकासूर : माका देतील?
नाईक : त्यांच्याकडून मागून घे?
संकासूर : (त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या कानात ओरड्तो आणि दाढीत हात घालून किस किस म्हणतो व हात झिड्कारुन हातातील दोरी जमिनीवर टाकतो आणि अगे माझे बाय म्हणून उडी मारतो व हातात काठी घेऊन मारण्यास जातो व म्हणतो) नाईक ह्यो मामा...
नाईक : म्हणजे आवशीचो भाव?
संकासूर : मामा न्हयं, पांढरो पांढरो... तो न्हय. ही कर्मभूमी आसा. तेवा जेना करुचा त्येना भरुचा तेवा ह्यांच्याकडे जा होता ता घेवन मी चलंलय (संकासूर जातो)
नाईक : (विष्णूचा धावा करतात) धाव धाव धाव. आता. सावळ्या! तुझविण नाही कोणी कृष्ण सावळ्या sss
संकासूर : हे विधात्या मी क्षिरसागरी शेषावर शयन केले असता एकाएकी धावा करण्याचे कारण काय?
नाईक : देवाधी देवा नारायणा कोणी संकासूराने, दैत्याने माझ्या वेदांचे हरण केले आहे. त्याचे वास्तव्य सप्तसागरात आहे. तरी त्वरित आणून देण्याची कृपा करावी.
संकासूर : मी मत्स्य अवतार धारण करीन. सागरात प्रवेश करीन. तुमचे वेद आणून देईन. आपण स्वस्थानी गमन करावे (दोघेही जातात)
नाईक : (संकासूराच्या नावाचा गजर करतो.) वेद हरण संकासूरा s s s s s (संकासूर येतो)
संकासूर : नाईक बसाक घाला.
नाईक : कोण तू?
संकासूर : सरकारी डोळो. सरकारातुन मानमत्ता मिळवलयं. हयसर बसतलयं (बसलो)
नाईक : दैत्यनाथा, ही सारी हत्यारे कशाला आणलीस?
संकासूर : नाईक तेका म्हेनत पडली हा, जुत्याचो अंगठो तुटलो म्हणान गेल्लय चांभाराकडे थय ही (आरी, रापी दाखवूण) दोन दिसली. इकती(युक्ती) केलय. चामाराक म्हटलय, "ओड मरे ईडी" तो आग हाडू गेलो भितूर. हडे हडे बघलय, उचललय नी लागलय चलाक.
(तेवढ्यात विष्णू पाठीवर थाप मारतो.) नाईक फटफटला खडे?
नाईक : तुझा वस्ताद आला आहे.
संकासूर : माझो वस्ताद मिया शिल्लक ठेवक नाय.
विष्णू : हे संकासूरा. तू म्हणे ब्रम्हदेवाचे वेद चोरलेस? आणून दे. नाहीतर युद्धास तयार हो.
संकासूर : वायचं समूर थांब. माजा अडाण्याचा आयकान ये, असो ईल्या ईल्या तापतय कित्याक?

नायक ऽ ऽ ऽ नायक.

नाईक : काय गडबड आहे?

संकासूर : ह्यो पोर म्हणता आयकतास? (विष्णूला उद्देशून) ह्यो म्हनता सातखंडी. सातखंडी दितय. बाकीचा कोण ह्येचो बापूस दितलो? अहो, मिया मोठो समरथ (समर्थ) एक दिस सकाळी आप्लो खांडीभर पोरा घातल्यान टोपल्यात आनी इलो दरांर रडत ह्योचो बापूस! माका मेल्याची दया यिली. एकदम बाराखंडी भात दिलय. तां रवला बाजूक नी ह्यो सांगता सातखंडी घे (विष्णु त्या बोलण्याने चिडला आणि त्याच्यावर अंगावर धावून गेला त्याची रापी, आरी हत्यारे काढून घेतली.)

संकासूर : ह्योच धंदो करा. राजकर्ते तुम्ही प्रजेक निशःत्र करा नी राज्य मोकळा करां. तुमच्या राज्यात धंदो करुक तरी मोकळीक खयं आसा? (मग विष्णुने त्याला दोन ठोशे दिले आणि उरलीसुरली हत्यार काढून घेतली. संकासूरावर गदेचे प्रहार केले.)

संकासूर : हे देवाधी देवा नारायणा, तुझ्या गदेच्या आद्याताने मी जर्जर झालो आहे. तेव्हा मला मंगल असा वर दे.

विष्णू : संकासुरा जो कोणी शंखावाचुन या महाविष्णूची पूजा करील त्याची पुजा निष्फळ ठरेल/ असा माझा मंगल आशिर्वाद आहे.

नाईक : केशव, माधव, मुकूंद मुरारी नारायण हरी गोपाळ (वादन-दिंता ता थयऽ ऽ ऽ ए जीतांम थय्य थां)

हा आडदशावतार संपला की मग, कुठच्यातरी एका पौराणिक कथेवर नाट्य सुरु होतो. हे नाट्य मग सुर्योदयापर्यंत रमते. दहिकाल्याची मजा प्रत्येक गावात अशीच असते. जिल्ह्यात असा कुडचाही गाव नाही. तेथे दहिकाला होत नाही. भले गावात वादविवादामुळे वार्षिक उत्सव, धार्मिक कार्यक्रम बंद असतात. परंतू गावाच्या मध्यवर्थी ठिकाणी दशावतारी नाटक होतेच होते. गावाची परंपरा आणि लोककला याचा हाच तर उत्सव असतो.

## संदर्भ

१) वाडकर धोंडीराम (डॉ.) 'लोकगंगा लोकसाहित्यविषयक विविध विषयांची चर्चा' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ. ३०

२) संहिता संपादन - श्री. देव हेळेकर दशावतार नाट्य मंडळ कारिवडे ता. सावंतवाडी नाट्यप्रयोग सोमवार दि. १८/११/२०१९, स्थळ श्री देवी कालिका मंदिर कारिवडे.